दै. ॲग्रोवन दि. २७/५/२०२१.

# जळगाव बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना पाच लाखांचा विमा

ॲग्रोवन वृत्तसेवा

बुलडाणा : जिल्ह्यातील जळगाव जामोद कृषी उत्पन्न बाजार समितीने कर्मचाऱ्यांना प्रत्येकी पाच लाखांचे विमा कवच दिले आहे. याबाबत नुकतेच कर्मचाऱ्यांना पत्र सुपूर्द करण्यात आले.

जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात जळगाव जामोद कृषी उत्पन्न बाजार समिती ओळखली जाते. एकमेव अडत मुक्त बाजार समिती म्हणूनही राज्यभर ओळख बनलेली आहे. बाजार समितीचा आसलगाव येथील धान्य व गुरांचा बाजार हा संपूर्ण जिल्ह्यासह खानदेशमध्ये प्रसिद्ध मानला जातो.

बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी, व्यापाऱ्यांशी संबंध येतो. कोरोनाचा सध्याचा वाढता उद्रेक बघता कर्मचाऱ्यांना होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या सेवेची दखल घेत बाजार समितीचे सभापती प्रसेनजीत पाटील व संचालक मंडळाने सर्व २२ कायम व रोजंदारी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण (मेडिकल क्लेम) देण्याचा निर्णय घेतला.

न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीसोबत बाजार समितीने या विषयीचा एक महत्त्वपूर्ण करार केला असून त्याचे पत्र नुकतेच सभापती प्रसेनजीत पाटील यांनी विमा कंपनीच्या अधिकाऱ्याकडून स्वीकारले. या निर्णयाबाबत सभापती व संचालकांचे बाजार समितीचे प्रधान सचिव प्रमोद पुदागे व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी आभार व्यक्त केले.